सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ८१ | शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

आजचे अभीष्टचिंतन



**श्री. श्रीनाथ पाटील**
प्रदेश सरचिटणीस : राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस



**श्री. भिकेश पावबा पाटील**
मा. उपसभापती, पंचायत समिती, अमळनेर

## दिनविशेष
१२ डिसेंबर

- आनंदमठ या बंकिमचंद्र यांच्या कादंबरीचे प्रकाशन, याच कादंबरीमध्ये वंदे मातरम् हे गीत आहे.
- दिल्ली भारताची राजधानी बनली. पूर्वी कोलकाता ही भारताची राजधानी होती.
- पृथ्वी क्षेपणास्त्राची चाचणी घेण्यात आली.
- प्रियांका चोप्राची युनिसेफ सदिच्छा दूत म्हणून नियुक्ती करण्यात आली.
- मुकेश डम्माराजू हे जागतिक बुद्धिबळ स्पर्धामध्ये विजेते ठरले.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

# केळी पिकाच्या ओलावृष्टी-विमा संरक्षणाची मुदत ३१ मेपर्यंत वाढवावी

## खासदार स्मितातार्ई वाघ यांची संसदेत लक्षवेधी मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- जळगाव जिल्हा केळीसाठी देशात प्रसिद्ध आहे. मात्र, निसर्गाच्या लहरीपणामुळे पिकांचे नुकसान होते. यासाठी केळी पिकाच्या ओलावृष्टी- विमा संरक्षणाची मुदत ही ३१ मे पर्यंत वाढविण्यात यावी, अशी मागणी खासदार स्मितातार्ई वाघ यांनी दिल्ली येथे संसदेत सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी केली आहे.

याबाबत खासदार स्मितातार्ई वाघ यांनी सांगितले, की सर्वात मोठा केळी उत्पादक जिल्हा म्हणून जळगावचा देशात नावलौकिक आहे. मात्र, गेल्या काही वर्षांत अत्यंत अनिश्चित हवामान, अनियमित पाऊस, ओलावृष्टि, सलग उच्च आर्द्रता आणि अचानक होणारे वातावरणातील बदल यामुळे केळी पिकांचे प्रचंड नुकसान होत आहे. या नुकसानीला सध्याच्या हवामान आधारित विमा योजनेत पुरेसे संरक्षण नाही. सध्या विमा योजनेनुसार ओलावृष्टी जोखीम कालावधी १ जानेवारी ते ३० एप्रिल असा निश्चित आहे. मात्र, केळी पिकाला मे महिन्याच्या अखेरीपर्यंत ओलावृष्टी आणि अत्यंत आर्द्रतेचा धोका कायम असतो. अनेक वेळा सलग ३- ४ दिवस पाऊस आणि ६० टक्केपेक्षा जास्त आर्द्रता राहते. त्यामुळे केळी पिकाची वाढ, दर्जा व उत्पादनावर गंभीर परिणाम होतो, असे कृषी विभागाचा अहवाल आणि स्थानिक हवामान केंद्राच्या आकडेवारीवरून दिसून येते. शेतकऱ्यांचे नुकसान हे केवळ नोंदींमध्ये दिसणाऱ्या दिवसापुरतेच मर्यादित नाही. प्रत्यक्ष हवामान परिस्थितीही बदलत आहे. म्हणूनच विमा जोखीम कालावधी संरक्षणाची मुदत १ जानेवारी ते ३१ मे पर्यंत वाढविण्यात यावी. हे वैज्ञानिकदृष्ट्या योग्य, न्याय्य आणि तातडीचे आहे. तसेच सलग अनेक दिवस टिकणाऱ्या प्रतिकूल हवामान स्थितींनाही विमा संरक्षणात समाविष्ट करावे. त्यामुळे शेतकऱ्यांना प्रत्यक्ष




लाभ होईल. त्यांच्या मेहनतीला योग्य सुरक्षाही मिळेल.



अमळनेर : महाराष्ट्र मंदिर महासंघातर्फे विविध मागण्यांसाठी गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन देताना विविध मंदिरांचे पदाधिकारी.
(छायाचित्र : **रजनीकांत पाटील**)

# मंदिरांच्या मालमत्तेवरील मुद्रांक, नोंदणी शुल्क माफ करावे

## महाराष्ट्र मंदिर महासंघातर्फे अमळनेर येथे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- राज्य महाराष्ट्र मंदिर महासंघातर्फे मंदिरांच्या मालमत्तेवरील मुद्रांक व नोंदणी शुक्ल माफ करण्याची मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर येथील मंगळ ग्रह सेवा संस्थेतर्फे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांच्या मार्गदर्शनाखाली विश्वस्तांनी गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन दिले आहे.

निवेदनात म्हटले आहे, की राज्यातील मंदिरांना दान रूपाने मिळणाऱ्या आणि मंदिराने खरेदी केलेल्या जमिनीवरील मुद्रांक शुल्क पूर्णतः माफ करावे. मंदिर महासंघ मंदिराचे संरक्षण करणे, त्यांच्यावर होणाऱ्या हल्ल्यांविरुद्ध कायदेशीर लढा देणे, मंदिर परिसरामध्ये मद्यमान आणि मांसाहार यासारख्या गोष्टींना प्रतिबंध करणे, तसेच मंदिरांमध्ये वस्त्रसंहिंता लागू करणे, हिंदुत्वाची आध्यात्मिक व सांस्कृतिक ओळख जपण्यासाठी जनजागृती करणे, मंदिरांच्या सरकारी करणाला विरोध करणे, प्रत्येक मंदिराचे व्यवस्थापन फक्त आणि फक्त हिंदू विश्वस्तांच्याच हाती असावे, अशी आग्रही भूमिका ठेवत महत्वपूर्ण कार्य निरंतर करीत आहे. त्यात मंदिर विश्वस्त, पुजारी आणि भाविकांना एकत्रित आणून राज्यस्तरावर मंदिरांच्या हितासाठी अहोरात्र काम करत आहे. त्यामुळे मंदिरांनी खरेदी केलेल्या जमिनीवर मुद्रांक व नोंदणी शुल्क माफ करून आम्हास उपकृत करावे, ही आग्रही विनंती.

दरम्यान, वर्णेश्वर महादेव मंदिर संस्थानचे अध्यक्ष सुभाष चौधरी, संजय शुक्ल, प्रकाश शहा, हनुमान मंदिराचे विश्वस्त राजू देसले, फरशी रोडवरील महादेव मंदिराचे विश्वस्त भावेश चौधरी, वाडी संस्थानचे विश्वस्त बापूसाहेब देशमुख, उदय देशपांडे, रमेश जोशी, गजानन महाराज मंदिराचे आर. बी. पवार आदींनीही प्रांताधिकारी भंगाळे यांना निवेदन दिले.

यापसंगी मंगळग्रह सेवा संस्थेचे उपाध्यक्ष एस. एन. पाटील, सचिव सुरेश बाविस्कर, विश्वस्त अनिल अहिरराव, मंगल सेवेकरी आर. टी. पाटील, श्रीमती यू. एन. शहा, नीलेश महाजन, बाळा पवार, जनसंपर्क अधिकारी शरद कुळकर्णी, रजनीकांत पाटील, मुख्य पुरोहित शुभम वैष्णव, तुषार दीक्षित, यश जोशी, गोपाळ पाठक आदी उपस्थित होते. निवेदनावर कोअर कमिटीचे सदस्य तथा मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांची स्वाक्षरी आहे. निवेदनाच्या प्रती पालकमंत्री ना. गुलाबराव पाटील, खासदार स्मितातार्ई वाघ, आमदार अनिलदादा पाटील, जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनाही पाठविण्यात आल्या आहेत.

# सोन्याच्या दरवाढीने खरेदीदारांना फुटला घाम

## लग्नसराईत वधू पितेही धास्तावले

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- सोन्याचे दर गेल्या काही दिवसांपासून गगनाला भिडले आहेत. त्याचा मोठा आर्थिक फटका रोजंदारी करणाऱ्या, मध्यमवर्गीय, शेतकरी, गरीब कुटुंबीयांना बसत आहे. त्यांनी सोने खरेदीकडे पाठ फिरवली आहे. लग्न सराई सुरू असल्याने वधू पिताही चांगलेच धास्तावले आहेत.

सोने आता केवळ संपत्तीचे प्रतीक राहिलेले नाही. लग्नांमध्ये सोने अंगावर घालण्याची फॅशन दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, अनेकांचे स्वप्न आणि सहजीवनाचे ध्येय या दरवाढीने कठीण झाले आहे. पारंपरिक भारतीय विवाह संस्कृतीत सोने हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. मात्र, भाव वाढीने पालक लग्नाचा खर्च सांभाळण्याच्या चिंतेत आहेत. मुलींच्या लग्नात दागिने कसे करायचे ? आणि इतर खर्च कसा करायचा? हा प्रश्न सध्या वधूपित्याला भेडसावत आहे. सध्या सोन्याचा दर १ लाख ३० हजारांवर जाऊन पोहोचला आहे. चांदी पावणेदोन लाखांच्या घरात पोहोचली आहे. सोने- चांदीच्या उच्चांकी दरामुळे लग्नाचा खर्चही वाढला आहे. त्यामुळे परंपरा जपावी की मुलींची स्वप्नपूर्ती, असा प्रश्न वधू पित्यांना पडला आहे. सोन्याशिवाय लग्नासाठी हॉलचे भाडे, पाहुण्यांसाठी भोजन, फोटोग्राफर, वेशभूषा, सजावट आणि प्रवासाचा खर्चही मोठा असतो. त्यामुळे दोन्ही खर्चाचा मेळ घालताना कसरत करावी लागत आहे. परिणामी बँका, पतसंस्था व वेळप्रसंगी खासगी सावकारांचे दरवाजे ठोठवावे लागत आहेत. त्यामुळे दर कमी होणार का? याकडे सर्वसामान्यांचे लक्ष लागून राहिले आहे.

वास्तविक परिस्थितीनुसार पर्यायी मार्ग निवडणे गरजेचे आहे. फॅशन ज्वेलरी किंवा कमी प्रमाणात सोन्याचा वापर करूनही लग्नाची परंपरा जपता येऊ शकते. जेणेकरून ते कुटुंब कर्जबाजारी होण्यापासून वाचू शकते. सद्यस्थिती बघता अशी सुरूवात होणे गरजेचे आहे. त्यामुळे वधूपिता कर्जबाजारी होणार नाही.



“ सोन्याच्या दरवाढीमुळे आमच्या व्यवसायावरही मोठा परिणाम झाला आहे. मध्यमवर्गीय शेतकरी कुटुंबाचा ओढा सोने खरेदी करण्याकडे कमी झाला आहे. त्यामुळे सोने- चांदी व्यवसायात मंदी आहे.

**-सचिन भामरे,**
संचालक, एस. के. ज्वेलर्स, अमळनेर.

# श्रीमंत प्रताप शेठ यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- दानशूर श्रीमंत प्रताप शेठ यांच्या १४६ व्या जयंतीनिमित्त गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी प्रताप महाविद्यालयात प्रतिमा पूजन करून अभिवादन करण्यात आले.

खानदेश शिक्षण मंडळ निवडणूक उपसमितीचे चेअरमन पंडित चौधरी, चिटणीस तथा उपप्राचार्य प्रा. पराग पाटील व महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. एच. डी. जाधव यांनी श्रीमंत प्रताप शेठ यांच्या प्रतिमेस पूजन करून पुष्प हार अर्पण केला. यापसंगी उपप्राचार्य प्रा. डॉ. अशोक पाटील, प्रा. डॉ. योगेश तोरवणे, प्रा. डॉ. विजय मांटे, आयक्यूएसीचे समन्वयक प्रा. डॉ.मुकेश भोळे, प्रा. डॉ. कुबेर कुमावत, प्रा. डॉ. कैलास निळे, प्रा. डॉ. शानाभाऊ बागुल, प्रा. डॉ. जितेंद्र पाटील, प्रा. विजय साळुंखे, प्रा. डॉ. तुषार रजाळे, प्रा. डॉ. भरतसिंग पाटील, प्रा. यु. जी. मोरे, प्रा. वसंत पाटील, प्रा. किरण पाटील, प्रा. सोनूसिंग पाटील, प्रा. पावरा, महाविद्यालयाचे कुलसचिव राकेश निळे, कार्यालय अधीक्षक देवेंद्र कांबळे, जयदेव भदाणे, बापू पाटील, अजय साटोटे, कमलाकर पाटील, धना भोई, महेंद्र पाटील, श्री. शर्मा आदींसह प्राध्यापक, प्राध्यापकेतर कमर्मचारी उपस्थित होते.



### खामताने बालिका अत्याचार प्रकरण

# विकृत मनोवृत्तीच्या नराधमास फाशीची शिक्षा द्यावी

## नाभिक पंचमंडळातर्फे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- सटाणा तालुक्यातील खामताने गावात एका बालिकेवर वृद्धाने लैंगिक अत्याचार केला आहे. या घटनेचे राज्यभरात तीव्र पडसाद उमटले आहेत. या घटनेतील आरोपीला कठोर शिक्षा द्यावी, अशी मागणी अमळनेर तालुका नाभिक पंच मंडळाने केली आहे. याबाबत मंडळाने गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांना निवेदन दिले आहे.



निवेदनात म्हटले आहे, की नाशिक जिल्ह्यातील सटाणा तालुक्यातील खामताने येथे नाभिक समाजातील ९ वर्षीय बालिकेवर ७० वर्षाच्या वृद्धाने लैंगिक अत्याचार केला आहे. त्या नराधमास अटक झालेली आहे. मात्र, या घटनेने राज्यातील नाभिक समाज पेटून उठला आहे. नागपूर येथे सुरू असलेल्या हिवाळी अधिवेशनात या घटनेची नोंद घेण्यात यावी. हा खटला फास्ट ट्रॅक कोर्टात (जलतगती न्यायालय) चालविण्यात यावा. नराधमास फाशीची शिक्षा देण्यात यावी.

निवेदनावर अमळनेर तालुका नाभिक कार्यकारी मंडळाचे तालुकाध्यक्ष मधुकर सैंदाणे, उपाध्यक्ष दिलीप सोनवणे, सचिव सिताराम बोरसे, खजिनदार भिकन सैंदाणे, संपर्क प्रमुख जगदीश ठाकरे, संघटक नंदलाल जगताप, जिल्हा सदस्य सुरेश वारुळे, गणेश सैंदाणे, संदीप सैंदाणे, धर्मेश निकुंभ, बाळकृष्ण सूर्यवंशी व हेमंत पवार यांच्या सह्या आहेत.

# शेवग्याच्या शेंगांचे दर भिडले गगनाला

## पन्नास रुपयांत केवळ दोनच शेंगा; उत्पन्नात घट, मागणी वाढल्याने तुटवडा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर- हिवाळा सुरू झाला, की शेवग्याची प्रचंड मागणी वाढते. मात्र, यंदा निसर्गाच्या लहरीपणामुळे शेवग्याच्या फुलधारांवर मोठा परिणाम झाला. शेवग्याच्या उत्पन्नात कमालीची घट आली आहे. बाजारात मागणी जास्त आणि तुटवडा कमी झाल्याने शेवग्याच्या शेंगांच्या दर गगनाला भिडले आहेत. ३०० ते ३२० रुपये किलो दर वधारले आहेत. ५० रुपयांमध्ये केवळ दोन ते तीनच शेंगा मिळत आहेत. भाज्यांच्या वाढत्या महागाईने आधीच नागरिक त्रस्त आहेत. त्यातच शेवग्याच्या



शेंगांचा भावही गगनाला भिडल्याने बजेट बिघडले आहे. हिवाळ्यात वाढलेली मागणी, हॉटेल-ढाबे व कॅटरिंग सेवांकडून मोठ्या प्रमाणावर खरेदी आणि उत्पादनातील घट यामुळे भाव कमी होण्याची चिन्हेही सध्या दिसून येत नाही. त्यामुळे 'सुपरफूड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या शेवग्याच्या शेंगा सर्वसामान्यांच्या ताटातून जवळजवळ गायबच झाले आहेत. शेवग्याच्या शेंगाचे अनेक फायदे असल्यामुळे अनेकजण जण शेवग्याच्या शेंगाना पसंती देतात. मात्र, बाजारात शेंगाची आवक घटल्याने तसेच दर वाढल्याने अनेकांनी शेंगाची खरेदी करणे टाळले आहे.

**अनेक भाज्यांचे दरही कडाडले**

यंदा भाज्यांची आवकही कमी असल्याचे दिसून येत आहे. परिणामी विविध भाज्यांचे दरही चांगलेच कडाडले आहेत. विविध भाज्यांचे सद्यस्थितीतील दर किलोनिहाय असे : पालक ६० रु., मिरची ६०, बटाटा ३०, टमाटा ६०, फ्लॉवर ७०, भेंडी ८०, कारले १००, गिलके ८०, वांगे १००.

“ शेवगाच नव्हे तर इतरही भाज्यांच्या दरात मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे. भाज्यांच्या दरवाढीमुळे रोज भाजी खरेदी करणे अशक्य झाले आहे. घरखर्चाचे महिन्याचे आर्थिक बजेटही कोलमडले आहे. महागाईवर नियंत्रण आणणे गरजेचे आहे.

**-भारती पाटील,** अमळनेर

ग्लोबल महातेज शुक्रवार, दि. १२ डिसेंबर २०२५ / २

मसाला पान





# स्मृतीने लग्न मोडल्याचे जाहीर केल्यानंतर जेमिमा रॉड्रिग्सची क्रिप्टिक पोस्ट

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**


स्मृती मानधना आणि पलाश मुच्छल यांचा संसार थाटण्यापूर्वीच लग्न मोडले आहे. दोघांनी याबाबतची अधिकृत घोषणा केली आहे. मात्र, त्याबाबतच्या चर्चा काही केल्या काही थांबत नाही. स्मृतीची खास मैत्रिण जेमिमा रॉड्रिग्सच्या एका पोस्टने आता लक्ष वेधून घेतले आहे..

स्मृती मानधनाच्या वैयक्तिक आयुष्यात २३ नोव्हेंबरला वादळ उठले. कोणाच्या विचारातही नसेल की असे काही घडू शकते. काही तासातच लग्न मोडले. मात्र, त्याबाबत कोणीही अधिकृत बोलत नव्हते. त्यामुळे चर्चांना उधाण आले होते. अखेर हे लग्न मोडल्याचे अधिकृतरित्या दोन्ही बाजूने स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे आता चर्चांना पूर्णविराम लागला आहे. मात्र, स्मृती मानधनाची मैत्रीण असलेल्या जेमिमाने केलेल्या क्रिप्टिक पोस्टमुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. स्मृतीचे

## महिला क्रिकेटपटूंनी घेतला असा निर्णय

लग्न मोडल्यानंतर जेमिमाने तिच्या इंस्टाग्रामवर एका बँडचे गाणे गातानाचा व्हिडीओ पोस्ट केला आहे. आता परिस्थितीच अशी आहे की कोणत्याही पोस्टचा थेट संबंध स्मृतीच्या लग्नाशी जोडला जाईल. तसेच आता होताना दिसत आहे. पोस्ट केलेल्या व्हिडीओत 'Man I Nee' हे गाणे बँड गाताना दिसत आहे. या गाण्यातील बोल सध्याच्या परिस्थिती जुळणारे असल्याने सर्वांचा भुवया उंचावल्या आहेत. हे गाणे स्मृती आणि पलाशच्या प्रकरणाशी जोडले जात आहे. 'आपण गमावलेल्या वेळेची भरपाई करत आहोत. मात्र, मला अजूनही तुमच्या भावना किंवा हेतू समजत नाहीत. कृपया तुम्हाला काय हवे आहे ते स्पष्टपणे सांगा.", असे त्या गाण्याचे बोल आहेत. त्यामुळे सध्याची परिस्थिती अनुकूल असे बोल असल्याने चाहते स्मृती आणि पलाशच्या लग्नाशी ही क्रिप्टीक पोस्ट जुळवत आहेत. चाहते जेमिमाच्या भावना आणि मानधनाच्या दुःखाला तिने दिलेल्या पाठिंब्याशी जोडत आहेत. इतकेच काय तर जेमिमाने व्हिडिओच्या थंबनेलवर लिहिले आहे. 'फक्त ये आणि मला हवा असलेला माणूस हो' दुसरीकडे, जेमिमा रॉड्रिग्सने पलाश मुच्छलला इंस्टाग्रामवर अनफॉलोही केले आहे.

टीम इंडियाच्या दहा महिला क्रिकेटपटूंनीही पलाश मुच्छलला अनफॉलो केले आहे. यात स्मृती मानधनासह, जेमिमा रॉड्रिग्स, रेणुका सिंह ठाकुर, दीप्ती शर्मा, ऋचा घोष, राधा यादव, श्रेयंका पाटील, अरुंधती रेड्डी, शिवाली शिंदे आणि यास्तिका भाटिया यांचे नाव आहे. स्मृती मानधना आणि पलाश मुच्छल पहिल्यांदा २०१९ मध्ये मुंबईत भेटले होते. त्यांची ओळख एका कॉमन मित्राने करून दिली होती. त्यानंतर एकमेकांशी ओळख वाढली आणि मैत्रीचे रुपांतर प्रेमात झाले. पाच वर्षे एकमेकांना डेट केल्यानंतर लग्नाचा निर्णय घेतला गेला. मात्र, नियतीच्या मनात काही वेगळं होते आणि लग्न होण्याआधीच मोडले.



# 'सर' आणि 'मॅडम' शब्दांचा खरा अर्थ काय?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आपल्या दररोजच्या बोली भाषेत 'सर' आणि 'मॅडम' हे शब्द सर्रासपणे वापरले जातात. मात्र, या शब्दांचे अर्थ माहिती आहेत का? याचे उत्तर जाणून घेऊयात.

सर हा शब्द कुठून आला ? : सर हा फ्रेंच शब्द आहे. हा शब्द सुरुवातीला राजे किंवा उच्च अधिकाऱ्यांना सूचित करण्यासाठी वापरला जात असे. नंतर हा शब्द सामान्यपणे वापरला जाऊ लागला. सर शब्द का वापरला जायचा? : प्राचीन काळात सर हा शब्द फक्त राजे किंवा उच्च पदांवर असलेल्या लोकांसाठी वापरला जायचा. मात्र, सध्या वडीलधारी आणि वरच्या पदावर असलेल्या लोकांना सर म्हटले जाते.

मॅडम हा फ्रेंच शब्द आहे. फ्रान्समध्ये उच्चवर्गीय महिलांसाठी हा शब्द वापरला जायचा. महिलेप्रती आदर व्यक्त करण्यासाठी हा शब्द वापरला जात असे. मॅडम शब्द भारतात कधी आला? : भारतात हा शब्द जास्त प्रचलित नव्हता. मात्र, इंग्रजांच्या आगमनानंतर या शब्दाचा ट्रेंड सुरू झाला. आता हा शब्द उच्च पदावरील महिलांसाठी वापरला जातो. भारतातील लोक कोणते शब्द वापरायचे? : भारतात या शब्दांऐवजी आदरणीय किंवा 'जी' असे शब्द वापरते जात होते. मात्र, इंग्रज आल्यानंतर सर आणि मॅडम हे शब्द लोकप्रिय झाले.



# शिवाजी महाराजांना छत्रपती का संबोधले जाते?

## कारण वाचून छाती अभिमानाने फुलेल

**ग्लोबल महातेज: वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराज १६६० च्या दशकात शिवाजी महाराज सैन्य आणि प्रशासनिक दृष्ट्या सर्वात बलवान मराठा नेते झाले होते. यामुळे त्यांच्या राज्याभिषेकाची मागणी तीव्र झाली. ही मागणी मराठा साम्राज्याच्या स्थैर्याचे प्रतीक होती. गुरु समर्थ रामदासांची मान्यतासमर्थ रामदासांनी त्यांना हिंदवी स्वराज्याचे योग्य नेतृत्व मानले. ही धार्मिक आणि सामाजिक मान्यता उपाधी मिळण्याचा आधार ठरली. त्यामुळे शिवाजी महाराजांना जनमान्यता मिळाली.

**राज्याभिषेक :** १६७४ चा ऐतिहासिक राज्याभिषेक शिवपुरीमध्ये राज्याभिषेकाची तयारी अनेक महिने चालली. संपूर्ण हिंदुस्थानातून पंडित, विद्वान प्रतिनिधी याठिकाणी आले होते. हा सोहळा मराठा साम्राज्याच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा ठरला.

**गागाभट्टांची पुष्टी :** काशीचे विद्वान गागाभट्ट यांनी त्यांचा वंश 'सिसोदिया राजपूत' परंपरेशी जोडला. त्यांनी शिवाजी महाराजांना राजतिलकासाठी योग्य घोषित केले. यामुळे 'छत्रपती' ही उपाधी औपचारिक स्वरुपात मिळाली.

**'छत्र' चे प्रतीक :** भारतीय परंपरेत 'छत्र' हे राजाच्या सर्वोच्च सत्ता आणि संरक्षणाचे प्रतीक मानले जाते. ते धारण करणाऱ्याला छत्रपती म्हणजे "छत्रधारी सम्राट" म्हटले जात असे. ही उपाधी राजाच्या सर्वोच्च अधिकाराचे प्रतीक होती.

**'पति' शब्दाचा अर्थ :** 'पति' म्हणजे स्वामी किंवा संरक्षक. त्यामुळे 'छत्रपती' म्हणजे असा राजा जो आपल्या प्रजेला संरक्षण देतो. राज्याचा सर्वोच्च अधिकार राखतो.

**मराठा साम्राज्याची एकजूट :** ही उपाधी इतर सरदारांवर सर्वोच्च नेतृत्व स्थापित करत होती. मराठा सैन्यशक्तीला यामुळे एकता आणि दिशा मिळाली. त्यामुळे साम्राज्य अधिक बळकट झाले.

हिंदवी स्वराज्याचा औपचारिक जन्म राज्याभिषेकामुळे मराठा शासन प्रथमच पूर्णतः स्वतंत्र आणि वैध सत्ता बनले होते. ही उपाधी स्वतंत्र भारताच्या स्वप्नाची घोषणा होती. यामुळे स्वराज्याची संकल्पना वास्तवात आली.

# अजब मुस्लीम देश




**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगात प्रत्येक देशाचे वेगळे चलन आहे. प्रत्येक चलनाचे वेगवेगळ्या देशात वेगळे मूल्य असते. असा एक मुस्लीम देश आहे, ज्याच्या एका नोटेचे मूल्य भारताच्या तब्बल ६. ८ लाख रुपयांबरोबर आहे.

जगात अनेक देशांची आपली वेगळी अशी चलनव्यवस्था आहे. त्यामुळेच प्रत्येक देशाचे वेगळे नाणे, वेगळी नोट असते. विशेष म्हणजे प्रत्येक देशाच्या चलनाचे मूल्य इतर देशाच्या चलनाच्या तुलनेत वेगळे असते. त्यामुळेच भारताच्या एका रुपयाचे मूल्य अन्य देशात गेले की बदलते. वेगवेगळ्या देशांच्या चलनाचा विषय निघाला, की अगोदर अमेरिकेच्या डॉलर या चलनाचे किंवा युरो या चलनाचा उल्लेख हमखास होतो. मात्र, या जगात असेही काही देश आहेत, ज्यांच्या चलनाचे मूल्य भारतीय चलानाच्या तुलनेत खूप जास्त आहे.

ब्रुनेई नावाचा असा एक मुस्लीम देश आहे, ज्याचे मूल्यदेखील भारतीय रुपयापेक्षा कितीतरी जास्त आहे. वाईड डॉट कॉमच्या रिपोर्टनुसार एक ब्रुनेई डॉलर हा भारताच्या ६८. ६१ रुपयांच्या बरोबर आहे. या देशात १० हजार ब्रुनेई डॉलरची एक नोट आहे. ही एक नोट भारताच्या जवळपास ६. ८ लाख रुपयांच्या बरोबर आहे. म्हणजेच ब्रुनेई देशातील दहा हजार डॉलरची एक नोट घेऊन तुम्ही भारतात आले, तर त्याची किंमत तब्बल ६. ८ लाख रुपये होते. ब्रुनेई हा देश भारताच्या तुलनेत खूपच लहान आहे. पण तो खूपच संपन्न असा देश आहे.

तेल आणि नैसर्गिक वायूच्या उत्पादनामुळे हा देश सधन आणि संपन्न आहे. या देशाची लोकसंख्या फक्त ५ लाख आहे. त्यामुळेच त्या देशातील लोक संपन्न असून त्या देशातील चलनाचे मूल्य एवढे जास्त आहे.

# धर्मेंद्र यांच्या घराबाहेर चाहत्यांची मोठी गर्दी; सनी-बॉबी देओलच्या निर्णयाचे होतेय कौतुक



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

धर्मेंद्र यांच्या नव्वदाव्या जन्मदिनी त्यांच्या चाहत्यांसाठी जुहू येथील निवासस्थानाचे दरवाजे खुले करण्यात आले होते. सनी आणि बॉबी देओल हे स्वतः चाहत्यांचे तेथे स्वागत करत होते. जुहू येथील बंगल्याबाहेर धर्मेंद्र यांच्या चाहत्यांनी मोठी गर्दी केली होती.

बॉलिवूड इंडस्ट्रीतील दिग्गज अभिनेते धर्मेंद्र यांचा सोमवार, दि. ८ डिसेंबर रोजी ९० वा जन्मदिन साजरा झाला. २४ नोव्हेंबर २०२५ रोजी त्यांचे मुंबईतील जुहू येथील निवासस्थानी निधन झाले. धर्मेंद्र यांच्या अंत्यसंस्कारात सहभागी होण्याची संधी त्यांच्या चाहत्यांना देण्यात आली नव्हती, किंवा त्यांची अंत्ययात्राही काढण्यात आली नव्हती. त्यामुळे सनी आणि बॉबी देओल या त्यांच्या दोन्ही मुलांवर अनेकांकडून टीका झाली. परंतु आता वडिलांच्या जन्मदिनी त्यांनी चाहत्यांसाठी जुहू येथील घराचे दरवाजे खुले केले होते. खुद्द सनी आणि बॉबी देओल यांनी चाहत्यांचे हात जोडून स्वागत केले. त्यांच्याशी संवाद साधला. धर्मेंद्र यांच्या जुहू येथील बंगल्याबाहेर चाहत्यांची मोठी गर्दी पाहावयास मिळाली.धर्मेंद्र यांच्या ९० व्या जन्मदिनी देशाच्या कानाकोपऱ्यातून चाहते जुहूमध्ये पोहोचले होते.

धर्मेंद्र यांच्यावर मुंबईतील विलेपार्ले येथील पवनहंस स्मशानभूमीवर अंत्यसंस्कार पार पडले. यावेळी बॉलिवूड इंडस्ट्रीतील काही मोजके सेलिब्रिटी उपस्थित होते. त्यानंतर सनी आणि बॉबी देओल यांच्याकडून एक आणि हेमा मालिनी यांच्याकडून दुसऱ्या शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. धर्मेंद्र यांच्या अंत्यसंस्काराबद्दल असंख्य चाहत्यांनी नाराजी व्यक्त केली होती. धर्मेंद्र यांची अंत्ययात्रा काढायला हवी होती, चाहत्यांना त्यांना अखेरचे पाहण्याची संधी मिळायला पाहिजे होती, अशी इच्छा अनेकांनी व्यक्त केली होती. अखेर सोमवारी त्यांच्या चाहत्यांसाठी जुहू येथील घराचे दरवाजे खुले करण्यात आले होते.

धर्मेंद्र यांच्या अंत्यविधीबद्दल अभिनेता सलमान खानने ' बिग बॉस १९ ' च्या ग्रँड फिनालेमध्ये मत व्यक्त केले होते. " दोन जणांचा अंत्यविधी आणि शोकसभा अत्यंत व्यवस्थितप्रकारे पार पाडण्यात आले होते. एक दिग्दर्शक सूरज बडजात्या यांच्या आईच्या निधनानंतर आणि दुसरे धर्मेंद्र यांच्या निधनानंतर. कुटुंबीयांनी अत्यंत आदरपूर्वक सर्व नियोजन केले होते. अर्थात सर्वजण रडत होते, परंतु एक जो आदर आणि जी सभ्यता असायला हवी, आयुष्याचे सेलिब्रेशन जसे असायला हवे.. ते येथे होते. यासाठी मी सनी, बॉबी आणि सर्व कुटुंबीयांना सलाम करतो. प्रत्येक अंत्यसंस्कार आणि शोकसभा अशाच पद्धतीने पार पडायला हवेत, " असे तो म्हणाला होता.

# जज्बा हो तो ऐसा! तीन महीने के बच्चे के साथ किया पास

## सक्सेस स्टोरी : आयपीएस पूनम दलाल की कहानी



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयपीएस पूनम दलाल की सफलता की कहानी इस बात का सबसेबड़ा सबूत है कि अगर मन में कुछ हासिल करने की ठान ली जाए, तो कोई भी शारीरिक चुनौती या पारिवारिक जिम्मेदारी रास्ते की रुकावट नहीं बन सकती। यह कहानी है हिम्मत और जज्बे की, जो हर उस इंसानको प्रेरणा देती है जो अपनी बड़ी जिम्मेदारी के साथ-साथ अपने सपने को भी पूरा करना चाहता है। हम बात कर रहे हैं आईपीएस पूनम दलाल की, जिन्होंने दिखा दिया कि मातृत्व और करियर दोनों को एक साथ साधा जा सकता है।

9 महीने की प्रेग्रेंसी में प्रीलिम्स की चुनौती

पूनम दलाल का सपना था कि वह देश की सबसे कठिन परीक्षा, यूपीएससी सिविल सेवा परीक्षा (सीएसई) को पास करें और एक बेहतर रैंक पाएं। जब वह अपनी तैयारी के अंतिम चरण में थीं, तो उनकी जिंदगी में एक बड़ा बदलाव आया-वह मां बनने वाली थीं। जब यूपीएससी प्रीलिम्स परीक्षा की तारीख आई, तब पूनम नौ महीने की गर्भवती थीं। इतनी मुश्किल शारीरिक स्थिति में भी, उन्होंने हार नहीं मानी। परीक्षा हॉल में बैठने का फैसला करना ही अपने आप में एक बहुत बड़ी चुनौती थी, लेकिन उनके मजबूत इरादों के आगे यह मुश्किल छोटी पड़ गई। दर्द और बेचैनी को सहते हुए भी उन्होंने सफलतापूर्वक प्रीलिम्स की परीक्षा दी और उसे पास भी किया।

3 महीने के बच्चे के साथ मेंस परीक्षा

इसके बाद, पूनम के सामने सबसे बड़ी परीक्षा थी- मेंस और इंटरव्यू। जब मेंस की परीक्षा हुई, तब पूनम एक तीन महीने के छोटे बच्चे की मां बन चुकी थीं। एक तरफ बच्चे की देखभाल की जिम्मेदारी, रातभर जागना और दूसरी तरफ लंबी-लंबी घंटों की पढ़ाई और कई दिनों तक चलने वाली मेंस की परीक्षा देना।मेंस के दौरान, पूनम अपने बच्चे और पढ़ाई के बीच बेहतरीन तालमेल बिठाया। उनके पति और परिवार ने इस दौरान उन्हें पूरा सपोर्ट दिया, जिससे वह परीक्षा पर पूरी तरह ध्यान दे सकीं। उन्होंने यह साबित कर दिया कि सही पारिवारिक सपोर्ट और खुद पर विश्वास हो तो कोई भी बाधा हमें रोक नहीं सकती।सफलता और प्रेरणायह पूनम की पहली सफलता नहीं थी। इससे पहले भी वह दिल्ली पुलिस में नौकरी कर चुकी थीं और उन्होंने यूपीएससी परीक्षा में एक बार छोटी रैंक भी हासिल की थी। लेकिन उनका लक्ष्य आयपीएस या आयएएस बनना था, जिसके लिए उन्होंने अपनी नौकरी छोड़कर फिर से तैयारी करने का जोखिम उठाया था। अपनी आखिरी कोशिश में, उन्होंने अपनी मेहनत और लगन से साल 2015 की यूपीएससी परीक्षा में ऑल इंडिया रैंक (AIR) 308 हासिल की और आखिरकार उन्हें भारतीय पुलिस सेवा (आयपीएस) मिली। आयपीएस पूनम दलाल की कहानी उन सभी महिलाओं के लिए एक मिसाल है जो मानती हैं कि मातृत्व या अन्य जिम्मेदारियां उनके करियर के रास्ते में रुकावट बन सकती हैं। उन्होंने दुनिया को बताया कि अगर आप अपने लक्ष्य पर डटे रहते हैं, तो समय और हालात चाहे कितने भी विपरीत क्यों न हों, आप अपने सपने पूरे कर सकते हैं। यह सिर्फ एक परीक्षा पास करने की कहानी नहीं, बल्कि दृढ़ संकल्प और आत्मविश्वास की जीत की कहानी है।

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# पोलीस, पत्रकारदिनानिमित्त जानेवारीत विविध स्पर्धा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– पोलीस प्रशासन व विविध पत्रकार संघटनांतर्फे २ जानेवारी २०२६ पोलीसदिन आणि ६ जानेवारी २०२६ पत्रकार दिनानिमित्त विविध क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सामाजिक बांधिलकी जोपासत तसेच पोलीस व पत्रकारांच्या कुटुंबियांमध्ये आपुलकीची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हे विविध उपक्रम राबविण्यात येणार आहेत.

पोलीस व पत्रकार संघातील विद्यार्थ्यांसाठी निबंध स्पर्धा, महिलांसाठी संगीत खूर्ची स्पर्धा व लिंबू चमचा, तसेच पोलिस व पत्रकारांसाठी मैत्रीपूर्ण क्रिकेट स्पर्धा अशा विविध उपक्रमांचा समावेश आहे. याशिवाय शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून समाजात मोलाचे योगदान देणाऱ्या मान्यवरांचा सत्काराचा कार्यक्रमही आयोजित करण्यात आला आहे.

### कार्यक्रमाचे वेळापत्रक असे

**२ जानेवारी :** पोलिस आणि पत्रकार संघातील सदस्यांसाठी मैत्रीपूर्ण क्रिकेट स्पर्धा.

**६ जानेवारी :** निबंध स्पर्धा, महिलांची संगीत खुर्ची स्पर्धा तसेच पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सत्कार आणि विजेत्यांचा गौरव करून कार्यक्रमाची सांगता होईल. या उपक्रमातून समाजातील भिन्न घटकांना एकत्र आणत परस्पर सहकार्य, आपुलकी आणि सामाजिक बांधिलकी दृढ करण्याचा प्रयत्न आयोजकांतर्फे केला जात आहे. शहरात या संयुक्त उपक्रमांची उत्सुकता असून, २ व ६ जानेवारीला होणाऱ्या विविध स्पर्धांमध्ये पोलीस प्रशासन व पत्रकार बांधवांच्या कुटूंबियांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केली आहे.

# भारत नव्हे, 'हा' आहे जगातील सर्वात सुरक्षित देश

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

भारतातील अनेक अशी शहरे आहेत जिथे क्राइम रेट सर्वाधिक आहे. मात्र, जगात असा एक देश आहे जेथे गुन्हेगारी दर अत्यंत कमी आहे. हा देश कोणता आहे, याची सविस्तर माहिती जाणून घेऊयात.

आईसलँड हा जगातील सर्वात सुरक्षित देश आहे. आईसलँडचा गुन्हेगारी दर, विशेषतः हिंसक गुन्ह्यांचा दर, जगातील इतर देशांच्या तुलनेत नगण्य आहे. दरवर्षी येथे १ ते ९ किंवा शून्य लोकांचा खून होतो.

या देशात सामाजिक आणि आर्थिक समानता खूप जास्त आहे. श्रीमंत आणि गरीब यांच्यातील मोठी दरी येथे नसल्यामुळे, गुन्हेगारीला कारणीभूत ठरणारे द्वेष आणि नैराश्य कमी असते. त्यामुळे नागरिक सुरक्षित आहेत.

आईसलँडमध्ये आरोग्य सेवा, शिक्षण आणि बेरोजगारीचे लाभ यांसारख्या क्षेत्रांमध्ये सरकारी मदत उपलब्ध आहे. यामुळे लोकांना जगण्यासाठी अवैध मार्गांचा अवलंब करण्याची गरज पडत नाही.

आईसलँडची एकूण लोकसंख्या सुमारे ३. ७ लाख आहे. लोकसंख्या कमी असल्यामुळे लोकांचा एकमेकांशी जवळचा आणि व्यक्तिगत संबंध असतो. प्रत्येकजण एकमेकांना ओळखतो. ज्यामुळे क्राइम रेट कमी आहे. त्यामुळे सर्व लोक सुरक्षित आहेत.



# ना खडू, ना फळा, गणित शिकविण्याचा मार्ग वेगळा

## साने गुरुजी विद्यालयातील शिक्षक डी. ए. धनगर यांचा आगळावेगळा उपक्रम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– येथील साने गुरुजी नूतन माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांना मैदानावर नेऊन आनंददायी, सोप्या व आगळ्यावेगळ्या पद्धतीने गणिताचे धडे देण्यात आले. गणित शिक्षक डी. ए. धनगर यांनी प्रत्यक्ष इमारतीच्या सावलीने व सुर्याच्या प्रकाशाने वर्तुळासंबंधी संकल्पना राबविली. प्रात्यक्षिकाद्वारे कृतीयुक्त अध्यापनाने विद्यार्थ्यांना सहजसोप्या पद्धतीने गणित समजावून सांगितले. संस्था सचिव संदीप घोरपडे व मुख्याध्यापक सुनील पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

सर्वसाधारणपणे गणित विषयातील संकल्पना प्रत्यक्ष डोळ्यांना दिसत नाही. त्या अमूर्त स्वरूपात असतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना गणिताचा अभ्यास करताना न्यूनगंड येतो, असे अनेकांना वाटते. मात्र, त्या संकल्पना मूर्त स्वरूपात अर्थात प्रत्यक्ष दिसण्याच्या स्वरूपात मांडल्या तर त्या विद्यार्थ्यांना लवकर समजतात. याचा विचार करून श्री. धनगर यांनी हा उपक्रम राबवला. त्यासाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष मैदानावर नेण्यात आले. नैसर्गिक साधन संपत्तीचा उपयोग करून संकल्पना त्यांनी मांडल्या. त्याकरिता सूर्याच्या प्रकाशाचा व इमारतीचा सावलीचा खूबीने सुयोग्य वापर करून जीवा ही संकल्पना प्रत्यक्ष मुलांना दाखवली. तत्पूर्वी विद्यार्थ्यांना एका खांबाच्या भोवती वर्तुळाकार बसविण्यात आले. वर्तुळाच्या ज्या भागावर विद्यार्थी बसले त्याला परिघ म्हणतात. त्याचवेळी त्या भागात इमारतीची सावली आली, वर्तुळाकार भागातील इमारतीची सावली म्हणजे जीवा असते हे मुलांना लक्षात आले. उपस्थित सर्वच मुले आनंदाने व औत्सुक्याने बघत होते. सावली हळूहळू पुढे सरकू लागली ती नेमकी मध्यभागी असलेल्या म्हणजे केंद्रावर असलेल्या खांबा जवळ आली. तेव्हा त्यांनी सांगितले, की जेव्हा जीवा वर्तुळाच्या केंद्रातून जाते तेव्हा त्याला व्यास म्हणतात. व्यास ही वर्तुळातील सर्वात मोठी जीवा असते, असे विद्यार्थ्यांना समजावून दिले. याच पद्धतीने दोर वापरून व प्रत्यक्ष मुलांना उभे करून त्रिज्या, जीवा, व्यास, केंद्र, परीघ, स्पर्शिका, छेदीका, वर्तुळाचा अंतर्भाग, वर्तुळाचा बाह्य भाग, केंद्रिय कोन, लघु वर्तुळ कंस व विशाल वर्तुळ कंस आदी संकल्पना दृश्य स्वरूपात समजावून देण्यात आल्या. अशाच पद्धतीने वर्तुळाला स्पर्शिका छेदिका काढून मूलांना समजाविण्यात आले. विद्यार्थ्यांनी देखील खेळीमेळीच्या वातावरणामध्ये आनंददायी पद्धतीने समजावून घेतले. निसर्गात गणित सामावलेले आहे, गरज आहे ते फक्त समजून घेण्याची याची प्रत्यक्ष अनुभूती विद्यार्थ्यांनी घेतली. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास सकारात्मक पद्धतीने वृद्धिंगत झाला. संस्थेचे अध्यक्ष हेमकांत पाटील, सचिव संदीप घोरपडे, मुख्याध्यापक सुनील पाटील, सर्व संचालक मंडळ व पालकांनी या उपक्रमाचे कौतुक केले. या उपक्रमाला जयेश मासरे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. मैदानावर शिकलेल्या गणिताची मजा काही औरच होती, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.

# साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या शिरसाळे संस्थेत बोगस भरती

## भरत चौधरी यांचा पत्रकार परिषदेत आरोप

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– तालुक्यातील शिरसाळे येथील पूज्य श्री साने गुरुजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित भिका यशोध चौधरी हायस्कूल व हिरामण जीवन पाटील कनिष्ठ महाविद्यालयात बोगस भरतीचा मोठा घोटाळा आहे. याबबत माध्यमिक शिक्षणाधिकारी, पुणे शिक्षण आयुक्त, एसआयटी प्रमुख, नाशिक शिक्षण उपसंचालक, मुंबई शिक्षण सचिव यांच्याकडे तक्रारी केल्या आहेत. मात्र, याबाबत दखल घेतली गेलेली नाही, असा आरोप सामाजिक कार्यकर्ते तथा जनरल सभासद भरत शांताराम चौधरी यांनी गुरुवार, दि. ११ डिसेंबर रोजी जुना टाऊन हॉल येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेतून केला आहे.



(छायाचित्र : नितेश बारी)

श्री. चौधरी यांनी पत्रकार परिषदेत सांगितले, की आर. एस. फयाजुद्दीन हे १२ जून २०१३ रोजी शिपाई म्हणून रुजू झाले. त्या काळातील मुख्याध्यापक मधुकर उघडू चौधरी यांनीच या नियुक्तीवर आक्षेप घेतला आहे. त्यांच्या कार्यकाळात ही भरती झालेलीच नाही, असे त्यांनी लेखी तक्रारीत म्हटले आहे. हर्षल दीपक चौधरी यांच्या १२ जून २०१५ रोजी झालेल्या नियुक्तीवरही तत्कालीन मुख्याध्यापक रवींद्र पांडुरंग मुसळे यांनी बोगस भरतीचा संशय व्यक्त केला आहे. तसेच हेमंत जयप्रकाश नेरकर (१३ जून २०१६), सुनीता लोटन पाटील (२१ जानेवारी २०१७), शितल सोमनाथ चौधरी, प्रियांका स्वप्निल पवार, वैशाली रवींद्र पाटील, भाग्यश्री नीलेश पाटील (२०१७) अशा एकापाठोपाठ एक अनेक भरत्या संशयास्पदरित्या केल्या गेल्या आहेत. सर्वात चिंताजनक बाब म्हणजे काही कर्मचाऱ्यांनी शाळेत रुजू झाल्यापासून प्रत्यक्ष वेतन व शासकीय मान्यतेनुसार मिळणारे वेतन यामध्ये मोठा फरक असल्याचा आरोप आहे. सुनीता लोटन पाटील, शितल सोमनाथ चौधरी आणि प्रियांका स्वप्निल पवार यांनी २०१७ पासून प्रत्येकी तब्बल ३३ लाख ४० हजार २७७ रूपयांचा फरक काढल्याचेही गंभीर आरोप आहेत. हे कर्मचारी यापूर्वी इतर शाळांमध्ये कार्यरत होते. त्यानंतरही नवीन संस्थेत त्यांची भरती करून शालेय शिक्षण प्रणालीत शालार्थ आयडी तयार करण्यात आली. या सर्व भरती प्रक्रियेच्या मागे सोमनाथ भास्कर चौधरी आणि पाचोऱ्यातील इम्रान हे 'मास्टर माइंड' आहेत. शालार्थ आयडी तयार करण्याच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात आर्थिक अनियमितता आणि भरतीत अनियमित व्यवहार झाले आहेत. संबंधित मास्टर माईंड व संस्थेचे विद्यमान अध्यक्ष संजय रामचंद्र शिरोडे, सचिव जगतराव शंकर पाटील, उपाध्यक्ष संतोष धनजी चौधरी, चेअरमन रामलाल वनजी पाटील, सदस्य युवराज भाऊराव पाटील, गोरख रावण पाटील, विनायक सोमा पाटील, पुंजू दगडू कुंभार, ललित जयंतीलाल शहा, रमेश विरचंद जैन (मयत) आणि पोपट अर्जुन चौधरी यांच्यावर कठोर कारवाईची मागणीही श्री. चौधरी यांनी पत्रकार परिषदेत केली आहे.

# शंभर कोटींच्या घराचा मालक, मात्र ५०व्या वर्षीही अविवाहित

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



बॉलिवूड अभिनेता अक्षय खन्ना २०२५ मध्ये पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. 'छावा' आणि 'धुरंधर'मधील त्याच्या खलनायकाच्या भूमिकेला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळतो आहे. त्याच्याकडे १, ६७, ००,००,००० संपत्ती आहे. २०२५ हे वर्ष अक्षय खन्नासाठी धमाकेदार ठरले आहे. विकी कौशलच्या छावा चित्रपटातील औरंगजेब ते रणवीर सिंहच्या धुरंधरमध्ये खलनायकाचा अभिनय प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला आहे. सिनेमा पाहिल्यानंतर प्रेक्षकांमध्ये फक्त अक्षय खन्नाची चर्चा रंगताना पहायला मिळते. त्याचा सिनेमातील डान्स तर सध्या ट्रेंडिंगवर आहे. या सिनेमात त्याने रहमान डकैत याचे पात्र साकारले आहे.



# संत गाडगे बाबांच्या कीर्तनातुन माणूस झाला विज्ञाननिष्ठ

## डॉ. रमेश माने : मारवड येथे 'मसाप' तर्फे व्याख्यान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर– संत गाडगे बाबांनी कुठलाही स्वार्थ न ठेवता निष्ठेने शिक्षणाचा जागर केला. समाजात डोळस विचार निर्माण व्हावा, माणूस हा विज्ञाननिष्ठ व्हावा यासाठी त्यांनी गावोगावी जाऊन प्रयत्न केले. ते परीट असले तरी त्यांनी कधी कुणाचे कपडे धुतले नाही. मात्र, माणसांची मने त्यांनी धुतली. माणसाची मने धुणारे संत म्हणून गाडगे बाबांनी कार्य केले, असे मत प्रताप महाविद्यालयाच्या मराठी विभागातील प्रा. डॉ. रमेश माने यांनी केले.

मारवड (ता. अमळनेर) येथे महाराष्ट्र साहित्य परिषद (शाखा अमळनेर) व मारवड सार्वजनिक वाचनालयातर्फे शनिवार, दि. ६ डिसेंबर रोजी 'भारतीय संत विचार जागरण अभियान' अंतर्गत झालेल्या 'संत गाडगे महाराज : जीवन व कार्य' या विषयावर ते बोलत होते. महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या अमळनेर शाखेचे अध्यक्ष संदीप घोरपडे अध्यक्षस्थानी होते. यावेळी मारवड सार्वजनिक वाचनालयाचे संस्थापक अध्यक्ष प्रा. शांताराम पाटील, निवृत्त केंद्रप्रमुख बन्सीलाल भागवत, हरिभाऊ मारवडकर, एल.जे.चौधरी, भाऊराव सोनवणे, पुरुषोत्तम नीळ, ह.भ.प. मुकुंदा महाराज, बी. डी. पाटील, भगवंत साळुंखे, सुनील साळुंखे, राजेंद्र जाधव, कैलास पाटील, भगवान नीळ, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब देशमुख, कार्यवाह दिनेश नाईक, सह कार्यवाह विजया गायकवाड, कोषाध्यक्ष उमेश काटे, कार्यकारिणी सदस्य दिलीप सोनवणे, गोकुळ बागुल, निरंजन पेंढारे, सुनिता पाटील, शरद पाटील, डॉ. ज्ञानेश्वर मराठे, मनोहर नेरकर, प्रा. बी. एन. चौधरी आदी उपस्थित होते.

डॉ. माने पुढे म्हणाले, की संत गाडगे बाबांनी सर्वसामान्य माणसांना कळणारी, समजणारी कीर्तन परंपरा जपली. अंगावर चिंध्या पांघरलेल्या, हातात खराटा, काठी आणि गाडगं असा त्यांचा वेष असून समाज प्रबोधननासाठी त्यांनी आयुष्यभर समर्पण दिले. कीर्तनाच्या माध्यमातून सतत लोकजागृती केली. त्यांनी समाजहित पाहून शाळा, धर्मशाळा, वसतिगृहे काढली. समाजातील अंधश्रद्धेला मूठमाती दिली. संतांची परंपरा गाडगे बाबांनी पुढे प्रवाहित ठेवली. यावेळी मारवड येथील ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते. शांताराम पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बी. एन. चौधरी यांनी परिचय करून दिला. निवृत्त मुख्याध्यापक एल. जे. चौधरी यांनी सूत्रसंचालन केले.


## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

बातमीसाठी संपर्क :
रजनीकांत पाटील : 8788441234
योगेश महाजन : 9850576058
भरत पाटील : 9922408434

जाहिरातीसाठी संपर्क :
शरद कुलकर्णी: 9922547800
रजनीकांत पाटील : 8788441234



ग्लोबल महातेज
आजच...! आपली जाहिरात बुक करा
दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास
'चमकण्याची' तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





### जाहिरात दर

| | |
|---|---|
| १) पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.

# मंगल पान

## विष्णुसहस्रनामाने होतात सर्व ग्रहपीडा, शत्रूपीडा, वास्तुदोष, पितृदोष, स्वभावदोष दूर



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हिंदू धर्मात विष्णुसहस्त्रनाम पठणाला अतिशय महत्त्व आहे. त्यामुळे अनेकजण विष्णुसहस्त्रनाम नित्य नियमाने पठण करतात.

१) दर बुधवारी ४ वेळा विष्णुसहस्रनाम म्हटल्यास आपल्या सर्व पितरांना सदगती मिळते.

२) नियमित रोज १२ वेळा विष्णुसहस्रनाम ६ महिने म्हटल्यास आपले सर्व प्रारब्ध नष्ट होते. इहलोकी कीर्ती व मोक्ष प्राप्त होतो. म्हणजेच भुक्ती व मुक्ती हे दोन्हीही प्राप्त होतात.

३) १५ हजार वेळा विष्णुसहस्रनाम म्हटले, तर एक विष्णुयाग केल्याचे फळ मिळते, असे पू. श्री डोंगरे महाराज विरचित भागवतात लिहिलेले आहे.

४) एकादशीच्या रात्री १२ वाजता स्नान करून विष्णुपुढे (प्रभू श्रीराम चंद्र/बालाजी/पांडुरंग/श्रीकृष्ण, फक्त नृसिंह नको) तुपाचा दिवा व उदबत्ती लावून विष्णुसहस्रनामाचे १२ पाठ १२ एकादशीच्या दिवशी केले, तर साक्षात भगवंताचे दर्शन होते.

५) ४० दिवसांच्या रोज १२ वेळा नियमित पठणाने अशक्य गोष्टी शक्य होतात.

६) सहस्रनामांनी अर्चन अथवा तूप किंवा तूप लावलेल्या तिळांनी विष्णुसहस्रनामांनी हवन केले, तर अतिशय उत्तम अनुभव येतात.

७) बालकृष्णाला तुलसी अर्चन करून मुलांकडून रोज एकदा विष्णुसहस्रनाम म्हणवून घेतले, तर त्यांचे उच्चार स्पष्ट व शुद्ध होण्यास मदत होते. तीन तुळशीची पाने त्यांनी चावून खाल्ली तर त्यांची बुद्धी तेजस्वी होण्यास मदत होते.

८) वास्तुदोष दूर होण्याकरिता रोज तीन पाठ आठवडाभर करावेत. याची सुरूवात बुधवारीच करावी. तुपाचा दिवा व उदबत्ती ही लावावीच.

९) बाहेरचा त्रास असेल, संतती मतिमंद-गतिमंद असेल, तर अशा व्यक्तीला रोज सकाळ-सायंकाळ श्रीविष्णुसहस्रनामाचे पाठ ऐकवावेत.

१०) घरामधे कोणी व्याधीग्रस्त असेल, तर विष्णुसहस्रनामाच्या पठणाने व्याधी नष्ट होऊन शरीराभोवती एक सुरक्षाकवच उभे राहते.

११) श्रीविष्णू मंदिरात बसून जो कोणी या स्तोत्राचा पाठ करतो त्याचे सर्व अहित नाहीसे होते. त्याला छळणाऱ्या सर्व गोष्टींचा परिहार होतो.

१२) विष्णुसहस्रनामाचे कोणत्याही प्रकारचे अनुष्ठान करायचे असेल, तर त्यासाठी रुद्रशाप विमोचन विधी करणे आवश्यक असते. परंतु जर ते शक्य नसेल तर त्याच्याऐवजी विष्णुसहस्रनामाच्या आधी व शेवटी ३ वेळा ॐ नमः शिवाय आणि 3 वेळा ॐ नमो भगवते वासुदेवाय असा जप करावा.

१३) श्रीविष्णुसहस्रनामाच्या फलश्रुतीत असे म्हटले आहे, की जो या स्तोत्राचे पठण करेल त्याने दिली पाहिजेत अशी सर्व दाने दिली आहेत आणि केले पाहिजेत अशा सर्व देवांचे पूजन केले आहे.

१४) पिंपळाच्या पारावर बसून विष्णूचे ध्यान करीत जो विष्णुसहस्रनामाचे पाठ करतो त्याची शतकोटी कल्पांमधील साचलेली पातके हळूहळू नष्ट होतात.

१५) शिवालयात, तुलसीवनात बसून जो रोज विष्णुसहस्रनामाचे पाठ करतो त्याला कोट्यवधी गायी दान दिल्याचे फळ प्राप्त होते आणि त्याला मोक्ष प्राप्त होतो, असे चक्रपाणींचे वचन आहे.

१६) श्रीविष्णू यांच्या अच्युत, अनंत, गोविंद या तीन नावांनी कोणत्याही प्रकारचा रोग नाहीसा होतो.

१७) आपल्याला कुठल्याही कामासाठी घरातून बाहेर पडायचे असेल, तर तेव्हा उंबरठ्याबाहेर उजवे पाऊल ठेवण्याआधी मनातल्या मनात ४ वेळा नारायण, नारायण, नारायण, नारायण असे नाम घ्यावे. (वरील माहिती विविध धर्म ग्रंथातून संकलीत केली आहे)

## सत्संग म्हणजे काय?



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एकदा नारद मुनींनी भगवान विष्णूंना सहज विचारले- "देवा सत्संग-सत्संग म्हणतात त्याचा एवढा काय हो महिमा"? यावर देवांनी त्यांना काही एक उत्तर न देता एका कीटकाचा निर्देश करून सांगितले की, "तो कीटक तुझ्या प्रश्नाचे उत्तर देईल."

**नारद मुनी त्या कीटकाला शोधत नरकापर्यंत गेले आणि त्यांनी त्या कीटकाला विचारले-**
"सत्संगाचे काय फळ आहे, तुला माहीत आहे का?"
कीटकाने त्यांच्याकडे एक कटाक्ष टाकला आणि तो मृत झाला. प्रश्नाचे उत्तर न मिळाल्याने ते पुन्हा भगवान श्रीविष्णूंकडे आले आणि म्हणाले,

"देवा तो कीटक तर काही बोलल्याविनाच मृत झाला. आता तुम्हीच उत्तर सांगा."

देवांनी नारदांचे म्हणणे ऐकून घेतले आणि ते म्हणाले, "तेथे पाहा त्या समोरच्या झाडावर घरट्यात एक नुकतेच जन्मलेले पोपटाचे पिलू आहे, ते तुझ्या प्रश्नाचे उत्तर देईल."

नारदमुनी त्या पोपटाचे पिलाजवळ गेले आणि त्यांनी त्यालाही तोच प्रश्न विचारला. पोपटाच्या पिलाने एकदा डोळे उघडून त्यांच्याकडे पाहिले आणि त्याने डोळे मिटले ते कायमचेच.

नारद मुनी मनाशीच विचार करू लागले, काय सत्संग करण्याचे फळ मृत्यू आहे? कारण मी ज्यांना ज्यांना हा प्रश्न केला ते मृत्यू पावले. अत्यंत दुःखी होऊन ते पुन्हा भगवान श्रीविष्णूंजवळ आले. म्हणाले, "देवा आपल्याला सांगायचे नसेल तर नका सांगू, पण मी ज्यांना- ज्यांना हा प्रश्न विचारतोय ते मृत होत आहेत. अजून किती जणांच्या हत्येच्या पापाचे धनी मला करणार आहात?" तेव्हा देव त्यांना म्हणाले, "त्याची चिंता तू करू नकोस. तुला खरेच जर या प्रश्नाचे उत्तर हवे असेल तर ते पहा नुकत्याच तिथे एका गाईने बछड्याला जन्म दिलाय तो बछडा तुझ्या प्रश्नाचे उत्तर देईल." दुःखी अंतःकरणाने नारदांनी तेथे जाऊन त्या बछड्याच्या कानाशी लागून त्यालाही तोच प्रश्न केला. त्यानेही दृष्टी वळवून त्यांचेकडे पाहिले आणि ते तेथेच लुढकले. नारद मुनी घाबरून देवांकडे परत आले. तथापि, त्यांना पुन्हा एकदा आश्वासित करून भगवान श्रीविष्णू म्हणाले, "एका राज्यात नुकताच एक राजपुत्र जन्माला आहे. त्याच्याकडून तुम्हाला निश्चित या प्रश्नाचे उत्तर मिळेल."

नारदांनी विचार केला, आता पर्यंत कीटक, पोपट व गाईच्या बछड्याचे मृत्यूने माझ्यावर काही आपत्ती आली नाही, पण राजकुमाराचे जर काही बरेवाईट झाले तर माझे प्राणही संकटात येऊ शकतात. तथापि, देवाचे विश्वासावर ते राजकुमाराकडे गेले आणि त्यांनी धाडस करून राजकुमाराला मांडीवर घेतले आणि पापा घेण्याचे निमित्त करून हळूच त्याचे कानात विचारले- "सत्संगतीत राहिल्याने काय लाभ होतो?" प्रश्न ऐकून राजकुमार हसू लागला आणि म्हणाला, "मुनिश्रेष्ठ, आपण अजून नाही समजलात का? अहो, आपण पहिल्यांदा मला भेटला तेव्हा मी कीटक होतो. आपण मला हा प्रश्न विचारला आणि मी मेलो आणि पोपट झालो. नंतर आपल्या दर्शनाने मी घरट्यात मेलो आणि मला गाईच्या बछड्याचा देह प्राप्त झाला. पुन्हा आपले दर्शन घडले आणि बछड्याचा देह पडून सर्व देहांमध्ये श्रेष्ठ असा हा मनुष्यदेह प्राप्त झाला आणि पुन्हा आपल्या दर्शनाने मला पूर्णत्व प्राप्त झाले. हे सर्व आपल्यासारख्या संतांचे दर्शनाचेच फळ आहे. ज्यांना आपल्यासारख्या संतांचा सहवास मिळतो ते धन्य आहेत."

नारदांना त्यांचे प्रश्नाचे उत्तर मिळाले व सत्संगाचा महिमाही कळला. "नारायण, नारायण" प्रेमाने म्हणत ते देवांकडे आले आणि म्हणाले, "देवा, जशी आपली लीला अगाध आहे, तशीच आपली समजावून देण्याची पद्धतही दिव्य आहे." म्हणून जीवन जगताना संगत ही खूप महत्त्वाची आहे. बाभळीच्या झाडाशेजारी केळीचे झाड वाढले तर,बाभळीच्या काट्याने त्याची संपूर्ण पाने फाटून जातात. याउलट चंदनाच्या झाडाशेजारी लिंबाचे झाड वाढले तर, लिंबाच्या गाभ्याला चंदनाचा सुवास येतो. ज्याप्रमाणे श्रीरामांच्या सहवासात हनुमान धन्य झाले, श्रीकृष्णांच्या सहवासाने अर्जुन सर्वश्रेष्ठ योद्धा झाला, याउलट दुर्योधनाच्या सहवासाने कर्ण श्रेष्ठ असूनही त्याचा नाश झाला. आपण ज्यासोबत राहतो त्याच्या विचारांचा, रहाणीचा, वागणीचा, अंमल हा आपल्यावर होत असतो. संगतीने विचार श्रेष्ठ अथवा दूषित होतात. संगत कशी हवी याचा विचार करावा.

## प्रयत्न आणि परमेश्वर यांची सांगड


**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जगात कुणीही सुखी नाही, असे समर्थ सांगतात. पण एखादा राजाच्या पोटी जन्माला आला म्हणून सुखी झाला, असे आपण मानतो. खाण्यापिण्याची अडचण नसली म्हणजे त्याला इतर काही काळज्याच नाहीत असे म्हणून कसे चालेल ? ' मागल्या जन्मी मी कुणाचा तरी घात केला म्हणून आज हे दुःख वाट्याला आले आहे, ' असे आपण म्हणतो, आणि त्याबरोबरच फलाशेने कर्म करून पुढील जन्माची तयारी आजच करू लागतो. पण त्यातून सुटण्याचा काही मार्ग पाहात नाही. कर्मामध्ये आजवर मोठमोठे लोक गुंतून राहिले आहेत. जन्माला आलो तो जन्माचे सार्थक करून घेण्याकरिता; पण या फेऱ्यातच आपण अडकून पडलो तर काय उपयोग ? आपण एखाद्या कापडाच्या गिरणीत गेलो तर म्हणतो, ' काय धोटे फिरतात ! ' परंतु फिरविणारा तर दुसरीकडेच असतो, त्याप्रमाणे देहाचे देहपण जीव असेल तोपर्यंत; त्यामधून तो जीवात्मा नाहीसा झाला, की देहाचे देहपणही नाहीसे होते. आत्म्याच्या संयोगाने सर्व काही चालते.

एका गृहस्थाला फार काम असे, जेवायलाही फुरसत मिळत नसे. त्याच्या आईने त्याच्या खिशात बदाम, खडीसाखर, वड्या अशा जिनसा टाकल्या आणि सांगितले, की " येताजाता, काम करता करता, एक एक तोंडात टाकीत जा. " त्याप्रमाणे, संतांनी आम्हाला नामरूपी खाऊ दिला आणि सांगितले, की " येताजाता, काम करता करता, हा तोंडात टाकीत जा, म्हणजे लोभाची भूक लागणारच नाही, फार सुख होईल. "

एका गृहस्थाचे त्याच्या भावाशी भांडण होते. त्याने जेव्हा आपले मृत्युपत्र केले तेव्हा त्यामध्ये लिहिले की, ' माझ्या शवाला माझ्या भावाचा हात लागू नये. ' काय ही देहबुद्धीची पराकाष्ठा. आज आपल्याला जे करणे योग्य आहे ते करायचे सोडून, मनुष्य कालचे आणि उद्याचे पाहात बसतो. पुष्कळ लोकांना ' उद्या काय होणार आहे ' हे कळायला पाहिजे असते. पण आपला पुढचा काळ चांगला याचा म्हणून आपण आज चांगले वागणे जरूर आहे; तसे न करता मागच्याचा किंवा पुढच्याचा विचार करीत बसणे म्हणजे जे करू नये ते करणे, हे मायेचे लक्षण होय. मायेच्या तावडीत जे सापडलेले आहेत ते लोक करू नये ते करतील, आणि उद्याची काळजी करतील. मनुष्याची एक स्थिती कधीच कायम राहात नाही. आजची वाईट स्थिती जाऊन चांगली स्थिती उद्या ना परवा येणारच असते. पण आपला प्रयत्न आपण कधी सोडू नये. व्यवहारात नेहमी प्रयत्न आणि परमेश्वर यांची सांगड घालावी. कर्माचा हेतू जाळून टाकावा ही पुढची पायरी. रामाच्या इच्छेने सर्व काही होते ही दृढ भावना ठेवून, मरणाची भीती बाळगू नये आणि जगण्याची काळजी करू नये. नेहमी नामस्मरणात राहण्याचा प्रयत्न करावा.

## या पायांना स्पर्श केल्याने नशिबात बदल होतो...!



अशी मान्यता आहे, की

१) वडिलांचे पाय स्पर्श केल्याने सूर्य मजबूत होतो

२) आजी, आई, काकू, मावशी, ताई यांच्या पायांना स्पर्श केल्याने चंद्र मजबूत होतो.

३) मोठ्या भावाच्या पायांना स्पर्श केल्याने मंगळ बलवान होतो.

४) मोठी बहीण व आत्याच्या पायांना स्पर्श केल्याने बुध मजबूत होतो.

५) गुरू, संत व ब्राह्मणांच्या पायांना स्पर्श केल्याने गुरू (बृहस्पती) मजबूत होतो.

६) आजोबा व वृद्धांच्या पायांना स्पर्श केल्याने केतू बलवान होतो.

७) वहिनीच्या पायांना स्पर्श केल्याने शुक्र मजबूत होतो.

८) सासरच्या नात्यांत गोडवा ठेवल्यास राहू बलवान होतो.

ज्येष्ठांचे आशीर्वाद म्हणजे आपल्या जीवनातील ग्रहांचा आश्रय! पायाला स्पर्श म्हणजे नम्रता, संस्कार आणि सुदृढ नात्यांची सुरूवात.

## राजा जनक आणि ऋषी अष्टावक्र



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राजा जनक राजा असूनही त्यांना राजवैभवात आसक्ती नव्हती. लोभ, मोहापासून ते सदैव दूर राहत. विनम्रता त्यांच्या स्वभावात होती. त्यामुळे ते आपले दोष दूर करण्याचा प्रयत्न करत असत. आत्मशोध घेण्याचा त्यांचा सदैव प्रयत्न सुरूच असे.

एकदा ते नदीकाठावर एकांतात बसून 'सोऽहम' चा जप करत होते. मोठ्या आवाजात त्यांचा जप सुरु होता. तेवढ्यात तेथून अष्टावक्र ऋषी चालले होते. ते परमज्ञानी असल्याने त्यांना राजा जनकाचा जप ऐकून ते जागेवरच थांबले व एका हातात छडी घेऊन थोडे दूर अंतरावर उभे राहिले. मग मोठ्या आवाजात तेही बोलू लागले, ''माझ्या हातात कमंडलू आहे आणि माझ्या हातात छडी आहे'' राजा जनकाच्या कानात ऋषींच्या बोलण्याचा आवाज गेला. पण त्याने आपला जप सुरूच ठेवला. अष्टावक्रही ही गोष्ट जोरजोरात बोलत राहिले. शेवटी जनकाने जप थांबवून विचारले, ''मुनिवर, हे तुम्ही मोठमोठ्याने काय सांगत आहात'' अष्टावक्र जनकाकडे पाहून हसले आणि म्हणाले, ''माझ्या हातात पाण्याचा कमंडलू आहे, माझ्या हातात छडी आहे'' राजा जनक आश्चर्यात पडला व विचारू लागला, '' महाराज अहो हे तर मलाही दिसत आहे की तुमच्याजवळ छडी आणि कमंडलू आहे पण हे दिसत असतानासुद्धा तुम्ही मोठ्याने ओरडून का सांगत आहात.'' तेव्हा अष्टावक्रांनी जनक राजांना समजाविले, '' राजन, माझ्याजवळ असणारा कमंडलू आणि छडी दिसत असतानासुद्धा ओरडून सांगणे हे जसे मूर्खपणाचे आहे तसेच तुमचे सोऽहम उंच आवाजात म्हणणे आहे. मंत्राला घोकण्याने काहीच फळ मिळत नाही. मंत्र आत्मसात करणे किंवा त्याला आतल्या चेतनेशी जोडल्यावरच त्याचे फळ मिळते.'' कोणतेही ज्ञान घोकंपट्टी करून मिळविण्यापेक्षा ते आत्मसात करण्याचा प्रयत्न झाला पाहिजे.

## भस्म



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'भ' म्हणजे 'भर्त्सनम' (नाश होणे) आणि 'स्म' म्हणजे 'स्मरणम' (स्मरण करणे). थोडक्यात ज्यामुळे आमची पापे नाश पावतात आणि आम्हाला ईश्वराचे स्मरण होते, ते भस्म ! भस्मातील 'भ' म्हणजे सगळ्या पापांची निंदा करण्याचे द्योतक आहे, तर 'स्म' यातून शिवाच्या स्मरणाची आठवण होते.

**व्याख्या :** कुठलीही वस्तू जाळल्यावर जी राख उरते, तिला 'भस्म' म्हणत नाहीत, तर देवाची पूजा म्हणून यज्ञात आहुती दिलेले तूप, समिधा, इतर वनस्पती इत्यादी सर्व जाळल्यावर जे अवशेष राहतात त्यालाच 'भस्म' म्हणतात.

**अर्थ :** भस्म लावणे, याचा सांकेतिक अर्थ म्हणजे 'दुष्कृत्यांचा नाश होणे' आणि 'ईश्वराची आळवणी करणे' होय.

**भस्माचे महत्त्व :** भस्म आपल्याला 'हे शरीर नश्वर आहे आणि एक दिवस त्याचीही राख होणार आहे; म्हणून आपण देहाची आसक्ती बाळगता कामा नये', याची आठवण करून देते.

**भस्माचा टिळा**

शिवभक्तीचे प्रतीक असणे-
भस्म हे विशेष करून शिवाशी संबंधित आहे. कारण भगवान शिव सर्वांगाला भस्म लावतात.
शिवभक्त आपल्या भालप्रदेशावर भस्माने त्रिपुंड्राकृती काढतात. कधी- कधी लाल रंगाचा टिळाही या त्रिपुंड्राच्या मध्यभागी काढतात.
तो टिळा शिवभक्तीचे प्रतीक मानला जातो. जीव-शिव यांच्या मीलनाने हे दृश्य आणि अदृश्य जगत निर्माण होते, हे दर्शविणारे चिन्ह होय.

**भस्म लावण्याचा उद्देश**

आम्हाला आमचे देहतादात्म्य सोडून या जन्ममरणाच्या फेऱ्यातून मुक्त व्हायचे आहे, याची आठवण म्हणून.

**भस्माचा वापर**

**अ) दंडावर भस्माचा वापर**

भस्म हे सर्वसाधारणपणे कपाळावर लावतात. काही जण दंड आणि छाती इत्यादी भागांवरही लावतात. काही तपस्वी सर्वांगाला भस्म लावतात.

**आ) भस्म कपाळाला लावताना पाळावयाचा दंडक**

उपनिषदे एक दंडक पाळायला सांगतात, 'भस्म कपाळाला लावताना 'महामृत्यूंजय मंत्रा'चा जप करावा.
ॐ त्र्यम्बकं यजामहे सुगन्धिं पुष्टिवर्धनम् ।
उर्वारुकमिव बन्धनान्मृत्योर्मुक्षीय माऽमृतात् ।।
ऋग्वेद, मण्डल ७, सूक्त ५९, ऋचा १२

**अर्थ :** कीर्तीमान आणि महाशक्तीशाली त्र्यंबकाचे (रुद्राचे) आम्ही यजन करतो. हे रुद्रा, काकडी देठापासून खुडावी, त्याप्रमाणे आम्हाला मृत्यूपासून मुक्त कर; पण अमरत्वापासून दूर ठेवू नको.

**आ) बरेच जण प्रत्येक वेळी चिमूटभर भस्मच वापरतात.**

इ) पूजा म्हणून देवाला राखेने अभिषेक घालतात. त्या भगवत् स्पर्शाने पवित्र झालेली राख भस्म म्हणून वाटतात.

**भस्माचे इतर प्रचलित शब्द**

**विभूती :** विभूती म्हणजे गौरव. विभूती लावणाऱ्यांना ती गौरव प्रदान करते.

**रक्षा :** रक्षा म्हणजे सुरक्षेचा स्त्रोत. रक्षा लावणाऱ्यांना तो निर्मल बनवतो आणि अनारोग्य अन् विपत्ती यापासून त्यांचे रक्षण करतो.

**भस्मातील औषधी गुण**

भस्मात काही औषधी गुण असल्याने ते आयुर्वेदिक उपचार पद्धतीत वापरतात. शरीरातील बाष्पता शोधून घेण्याच्या क्षमतेमुळे डोकेदुखी, सर्दी या व्याधींसाठी त्याचा औषधात उपयोग होतो.

**ब्रह्माप्रमाणेच राखही शाश्वत असते.**

लाकडे जळल्यावर त्यांची केवळ राख शेष रहाते. त्या राखेचा आणखी नाश होत नाही. त्याचप्रमाणे ब्रह्म हे अविनाशी सत्य आहे. असंख्य नाम रूपात्मक असणारी ही दृश्ये आणि अदृश्य सृष्टी नष्ट झाली, तरी हे 'सत्य' विद्यमान राहते. -

**भस्माची शिकवण**

१) मनुष्याने आपली आहुती देऊन भस्म होणे, म्हणजे आपल्या इच्छा-आकांक्षा, दोष, अज्ञान अन् अहं यांचा त्याग करणे आणि मनाची शुद्धता प्राप्त करणे

२) मानवी देह हा नश्वर असल्याने मरणानंतर त्या देहाची जळून राखोटी होणार आहे. त्यामुळे कोणीही देहासक्ती बाळगू नये. मृत्यू कोणत्याही क्षणी येऊ शकतो, याची जाणीव ठेवून मोठ्या महत्प्रयासाने मिळालेला मनुष्यजन्म सार्थकी लावण्यासाठी आणि आपला प्रत्येक क्षण पवित्र अन् आनंददायी करण्यासाठी प्रयत्नरत राहिले पाहिजे, असे भस्म सूचित करते. अर्थात् यातून साधनेचे महत्त्व पुनः एकदा अधोरेखित होते.

### शरीरावर कोणत्या बारा ठिकाणी भस्म लावावे? आणि त्या ठिकाणी कोणती देवता असते ?



**ललाटे केशवं विद्यात् कंठे श्रीपुरुषोत्तमं।**
**नाभौ नारायणं देवं वैकुंठं हृदयेस्तथा ॥ १ ॥**

**दामोदरे वामपाश्वै दक्षिणेच त्रिविक्रमं ।**
**मुर्धीचैव हृषीकेशं पद्मनाभं पृष्टतः ॥२॥**

**कर्णयो यमुना गंगे बाहो कृष्णं हरिः तथा ।**
**यथा स्थानेषु तुष्यन्ति देवता स्मृताः ॥३॥**

**द्वादशज्योतिर्लिंगनि नामानी कर्तव्यो तिलके पठेत ।**
**सर्वपाप विशुध्दात्मा विष्णूलोकं स गच्छती॥ ४ ॥**

**१) कपाळ : महादेव**
**२) कंठ : पुरुषोत्तम**
**३) नाभि : शिव**
**४) हृदय : रुद्र**
**५) पोटाची डावी बाजू : दामोदर**
**६) पोटाची उजवी बाजू : त्रिवीक्रम**
**७) डोक्यावर शेंडीच्या ठिकाणी : हृषिकेश**
**८) पाठ : पद्मणाभ**
**९) डावा कान : यमूना**
**१०) उजवा कान : गंगा**
**११) डावा दंड : हर**
**१२) उजवा दंड : हरि**

**या बारा ठिकाणी विरशैवानी भस्म लावावे.**